महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा) मधील उपशिक्षणाधिकारी व तत्सम, गट-ब संवर्गात सरळसेवेने नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांचा परिविक्षाधीन कालावधी पूर्ण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : पकास-२४१९/प्र.क्र.५६/प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०००३२
दिनांक:- ११ एप्रिल, २०१९

पहा :- शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, क्रमांक- ससप्रे-४३११/प्र.क्र.४७६/१३/प्रशा-२, दिनांक ४ मार्च, २०१४

शासन निर्णय :-

महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा) मधील उपशिक्षणाधिकारी व तत्सम, गट-ब संवर्गातील खालील अधिकाऱ्याची वर नमूद दिनांक ४.०३.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये २ वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीकरिता नियुक्ती करण्यात आली होती.

अ. क्र.	अधिकाऱ्याचे नाव	शासन सेवेत नियुक्ती केलेल्या आदेशाचा दिनांक	शासन सेवेत रुजू झाल्याचा दिनांक	रकाना-४ मधील दिनांका नुसार परिविक्षा कालावधी पूर्ण होण्याचा दिनांक	परिविक्षा कालावधीत घेतलेली अर्जित / परिवर्तित रजा व कालावधी	रकाना-६ मधील कारणामुळे वाढलेला परिविक्षा कालावधी पूर्ण होण्याचा दिनांक	परिविक्षा कालावधीत समाधानकारक रित्या पूर्ण केल्यामुळे शासन सेवा ज्या दिनांका पासून पुढे चालू ठेवावयाची आहे तो दिनांक
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
१	श्री.संजय श्रीरंग धुमाळ	४.०३.१४	२०.०३.१४	२०.०३.१६	निरंक	२०.०३.१६	२१.०३.२०१६

२. सदरहू अधिकाऱ्यांनी परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केला असल्यामुळे त्यांची नियुक्ती त्यांच्या नावांसमोर रकाना क्र. ८ मध्ये दर्शविलेल्या दिनांकापासून पुढे चालू ठेवण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०४१६१४३८००९५२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Ravindra Pralhad Ate

Digitally signed by Ravindra Pralhad Ate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sport Departrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd5fc4fce5f6732e6657dca817ae6ee619a55d170d3c93eff53c3ca69d1a772d, serialNumber=eaa37af2edb5809b000f33d26328f6cdac80ee32afdac3f68b5821d14e41dffa, cn=Ravindra Pralhad Ate
Date: 2019.04.16 14:51:21 +05'30'

(र. प्र. आटे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) सर्व संचालक
३) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
४) सबंधित जिल्ह्यांचे शिक्षणाधिकारीमहालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
५) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
६) संबंधित अधिकारी.
७) निवडनस्ती